सन २०१४-१५ मध्ये पाणलोट विकास चळवळीसाठी अर्थसंकल्पित झालेला निधी जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पाविच-२०१४/प्र.क्र.५६ / जल ८**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: २० मार्च, २०१५**

वाचा :

१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अंदाज-२०१४/प्र.क्र.११०/अर्थ-३,दि.०१ जुलै,२०१४
२) शासन परिपत्रक जलसंधारण विभाग क्र. लोकसो-२०१४ / प्र.क्र. ९३ / जल ७ दिनांक ७ ऑगस्ट,२०१४
३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.पाविच-२०१४ / प्र.क्र.५६ / जल-८ दिनांक ०७ ऑगस्ट, १२ सप्टेंबर,२०१४ आणि १७ जानेवारी २०१५
४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांचे पत्र क्र. मृदसं /मृद-१ /पाविचका/ निधीवि / १४-१५ / २२४ / १५ दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५
५) नियोजन (रोहयो ) शासन निर्णय क्र. आईसी २०१४ / प्र.क्र. ५२ / रोहयो-६ब दिनांक २० मार्च २०१५

**प्रस्तावना :-**

राज्यातील बहुतांशी क्षेत्र कोरडवाहू असून उपलब्ध जलस्त्रोताचा उपयोग केला तरी देखील ७० टक्के पेक्षा जास्त क्षेत्र कायम स्वरुपी नैसर्गिकरित्या पडणा-या पावसावरच अवलंबून रहाणार आहे. हे लक्षात घेऊन पाणलोट क्षेत्रविकासाचा कार्यक्रम गेल्या अनेक वर्षापासून राज्यात सुरु असून, सुरु केलेले पाणलोट मोठया प्रमाणावर अपूर्ण आहेत. हे पाणलोट गतीमान पध्दतीने विकसित करण्याचा धडक कार्यक्रम देखील शासनाने हाती घेतला आहे. महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान प्रामुख्याने लोकसहभागातून राबविणेस राज्यात गेली काही वर्षे सुरु आहे. या व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत देखील जलसंधारणाच्या कामास फार मोठे महत्व आहे.

राज्यात वारंवार पडणारा दुष्काळ पाहता पाण्याचे नियोजन ही काळाची गरज आहे. यासाठी नरेगा अंतर्गत जलसंधारण व जलसंवर्धनावर अधिकाधिक भर दिला जात आहे. तसेच, जलसंधारण विभागामार्फत पुढील ५ वर्षात संपूर्ण राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात या वर्षासाठी सुमारे ६००० गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियानाबाबत ग्रामीण भागातील जनतेमध्ये प्रचार प्रसिध्दीच्या माध्यमातून व्यापक जाणीव-जागृती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. हे सर्व प्रयत्न जरी होत असले तरी राज्यातील पाणलोट क्षेत्राची व्याप्ती फार मोठी आहे. मृद व जलसंवर्धनाचे उद्दिष्ट व महत्व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाकरिता पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २५ ऑगस्ट २००८ च्या शासन निर्णयाव्दारे घेतला. सन २०१४-१५ मध्ये पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम राबविण्यासाठी जाहिरात व प्रसिध्दी या बाबीसाठी रु. ३८५.०० लाख निधी अर्थसंकल्पीत झाला आहे. सदर निधीतून रु. ११९.८०२ लक्ष (एकशे एकोणीस लक्ष अंशी हजार दोनशे केवळ) एव्हढ्या निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

# शासन निर्णय:

सन २०१४-१५ या आर्थीक वर्षामध्ये पाणलोट विकास चळवळीसाठी अर्थसंकल्पित झालेल्या निधीतून रु. ११९.८०२ लक्ष (एकशे एकोणीस लक्ष अंशी हजार दोनशे केवळ) एव्हढा निधी जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. हा मंजुर रु. ११९.८०२ लक्ष (एकशे एकोणीस लक्ष अंशी हजार दोनशे केवळ) निधी केवळ कोकण, नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागातील जिल्हामध्ये फिरत्या वाहनाच्या (मोबाईल व्हॅन) द्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी आणि जलसंधारण विभागाद्वारे राबविण्यात येणा-या सर्व योजनेंतर्गत घेण्यात येणारी विविध कामे तसेच, क्षेत्रिय स्तरावर जलयुक्त शिवार अभियान व्यापकदृष्टया लोकांपर्यत पोहचविण्यासाठी माध्यमातून जाणीव जागृती करण्यावर खर्च करण्यात यावा.

३. फिरत्या वाहनाच्या (मोबाईल व्हॅन ) माध्यमातून हा उपक्रम राबविण्यासाठी नियोजन विभाग (रोहयो) विभागाने दिनांक २० मार्च २०१५ च्या शासन निर्णयान्वये औरंगाबाद व पुणे विभागासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याच सूचना इतर चार (कोकण, नाशिक, अमरावती आणि नागपूर) विभागास लागू राहतील त्या खालीलप्रमाणे आहेत:

**अ) <u>मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून जन जागृती करण्याचा कालावधी :</u>**

१ महिना (दि.१ एप्रिल,२०१५ ते दि.१ मे, २०१५)

**आ) <u>मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून जन जागृती करण्यासाठी निवडण्यात आलेली गावे :-</u>**

राज्यातून जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत निवडण्यात आलेल्या ६००० गावांपैकी कोकण, नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागातील निवडण्यात आलेली सर्व ३४१८ गावे.

इ) **<u>आयईसी मोबाइल व्हॅनच्या तपशील :-</u>**

हा उपक्रम राबविण्यासाठी कोकण, नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागाकरिता एकूण ६८ व्हॅनची आवश्यकता आहे (साधारणपणे ५० गावांमागे एक मोबाइल व्हॅन याप्रमाणे). त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | जिल्हा | तालुक्यांची संख्या | जलयुक्त शिवार अभियानातंर्गत निवडलेली गावे | आवश्यक व्हॅनची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रायगड | १५ | ४५ | १ |
| २ | रत्नागिरी | ९ | ४५ | १ |
| ३ | सिंधुदुर्ग | ८ | ३४ | १ |
| ४ | ठाणे | ५ | २६ | १ |
| ५ | पालघर | ८ | ५० | १ |
| एकुण कोकण विभाग | | ४५ | २०० | ५ |
| ६ | अहमदनगर | १४ | २७९ | ६ |
| ७ | धुळे | ४ | १२९ | २ |
| ८ | जळगाव | १५ | २३२ | ४ |
| ९ | नंदुरबार | ६ | ७२ | २ |
| १० | नाशिक | १५ | २२९ | ४ |
| एकुण नाशिक विभाग | | ५४ | ९४१ | १८ |
| २४ | भंडारा | ७ | ८६ | २ |
| २५ | चंद्रपूर | १५ | २१८ | ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | गडचिरोली | १२ | १५२ | ३ |
| २७ | गोंदीया | ८ | ९४ | २ |
| २८ | नागपूर | १३ | ३१३ | ६ |
| २९ | वर्धा | ८ | २१४ | ४ |
| **एकुण नागपुर विभाग** | | **६३** | **१०७७** | **२१** |
| ३० | अकोला | ७ | १८० | ४ |
| ३१ | अमरावती | १४ | २४३ | ५ |
| ३२ | बुलढाणा | १२ | २५६ | ५ |
| ३३ | वाशिम | ६ | १८५ | ४ |
| ३४ | यवतमाळ | १६ | ३३६ | ६ |
| **एकुण अमरावती विभाग** | | **५५** | **१२००** | **२४** |
| **एकुण विभाग** | | **२१७** | **३४१८** | **६८** |

१) जिल्हयासाठी लागणाऱ्या व्हॅन संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने उपरोक्त नमूद संख्येनुसार भाडेतत्वावर घ्यावे. उदा. Pick up व्हॅन या वाहनासारखी असावीत.

२) सदर व्हॅनसोबत माईक, स्पीकर, टीव्ही/एलसीडी, प्रोजेक्टर, डीव्हीडी प्लेयर, नरेगा व जलसंधारणाशी संबंधित शॉर्टफिल्म्स, शैक्षणिक फिल्म, व्हिडिओ जिंगल्स, ऑडिओ जिंगल्सच्या सीडीज/ डीव्हीडीज तसेच, लघु प्रदर्शन आयोजित करण्यासाठी लागणारे साहित्य व नरेगा आणि जलयुक्त शिवार अभियानासंबंधिचे इतर प्रसिध्द साहित्य असावे.

**ई) <u>मोबाइल व्हॅन आणि इतर साधन सामुग्री भाडेतत्वावर घेण्याची प्रक्रिया -</u>**

१. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाने मोबाईल व्हॅन व त्यासोबत आवश्यक असणारी उपरोक्त सामुग्री भाडेतत्वावर घ्यावी.

२. या प्रयोजनासाठी जिल्हास्तरावरून सर्वाधिक खप असलेल्या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व्हॅन भाडेतत्वावर घेण्यासाठी विहीत निविदा प्रक्रिया पार पाडावी.

३. मोबाइल व्हॅन आणि त्यासोबत आवश्यक असणाऱ्या इतर साधन सामुग्रीचे सविस्तर खर्चासह विवरण तक्ता क्र.१ व तक्ता क्र.२ मध्ये दिलेले आहे.

४. **मोबाइल व्हॅन आणि त्यासोबत आवश्यक असणाऱ्या इतर साधन सामुग्रीची भाडेतत्वावर संपादन प्रक्रिया, उपक्रम नियोजन, संनियंत्रण, अहवाल इ. बाबी खालीलप्रमाणे पार पाडाव्यात.**

i. मोबाईल व्हॅनसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देणे.

ii. प्राप्त निविदांची छाननी करणे.

iii. निवड झालेल्या व्हॅन मालकांसोबत करार करणे.

iv. व्हॅन सजावटीसाठी व साधन सामुग्री वाहनामध्ये बसविण्यासाठी मुदत देणे.

v. शासनाकडून पाठविलेल्या artwork नुसार आवश्यक साहित्याची छपाई करुन घेणे.

vi. मोबाईल व्हॅनसाठी दौऱ्याचे नियोजन करणे, तालुका वाटप आणि व्हॅनसोबत असणाऱ्या अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे दौऱ्यासंबंधी प्रशिक्षण आयोजित करणे.

vii. प्रत्यक्ष उपक्रमाला शुभारंभ करणे.

viii. उपक्रमाचा समारोप करणे.

ix. उपक्रमाचा अहवाल तयार करणे.

**उ) <u>उपक्रमाची सर्वसाधारण रूपरेषा :-</u>**

१. रोहयो आणि जलसंधारण विभाग या विभागांमार्फत संयुक्त रितीने हा उपक्रम राबविला जाईल.

२. एका दिवसात एक व्हॅन **फक्त दोन** गावांना भेट देईल.

**ऊ) <u>मोबाईल व्हॅनची सजावट : -</u>**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणारी विविध कामे व जलयुक्त शिवार अभियानाशी संबंधित संदेश व चित्रे सदर व्हॅनवर लावण्यात यावी.

२. मोबाईल व्हॅनवर लावण्यात येणाऱ्या पॅनेल्सवरील संदेश, चित्रे व स्टँडीजचे आर्टवर्क शासनामार्फत तयार करून त्याची सॉफ्ट कॉपी सर्व जिल्हयाना पाठविण्यात येईल.या सॉफ्ट कॉपीमध्ये पाठविलेल्या आर्टवर्कप्रमाणे स्थानिक स्तरावर छपाई करुन सदर साहित्य वाहनावर लावण्यात यावे.

३. मोबाईल व्हॅनमध्ये टीव्ही/ डीव्हीडी प्लेयर लावण्याची व्यवस्था असावी.

४. ही मोबाईल व्हॅन महिन्यातून अंदाजे किमान ३००० कि. मी. इतका प्रवास करेल .

**ए) <u>मोबाईल व्हॅनसोबत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची/शासनाच्या प्रतिंनिधींची नियुक्ती :-</u>**

१. मोबाईल व्हॅनसोबत संबंधित जिल्ह्यांचे दोन प्रतिनिधी (ड्रायव्हर आणि क्लीनर वगळून) असावेत, याबाबत उप जिल्हाधिकारी (रोहयो) आणि अधिक्षक जिल्हा कृषि अधिकारी (जल संधारण) यांनी समन्वयाने प्रतिनिधींची नियुक्ती करावी.

२. या उपक्रमाअंतर्गत संबंधित ग्राम पंचायतीचे ग्राम रोजगार सेवक आणि कृषि सहायक यांनी संबंधित गाव व ग्राम पंचायतीमध्ये स्थानिक स्तरावर संबंधित तालुक्याच्या मोबाईल व्हॅनमधील प्रतिनिधींशी संपर्क साधून स्थानिक स्तरावर समन्वय साधावा.

३. तालुका कृषि अधिकारी, तहसिलदार आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी परस्पर समन्वयाने या उपक्रमाची अंमलबजावणी करावी. यासाठी आवश्यक बैठकांचे आयोजन त्यांच्या स्तरावर करावे व व्हॅनच्या मार्गक्रमणाची रुपरेषा निश्चित करावी.

४. या व्हॅनसोबत असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय नियमाप्रमाणे अनुज्ञेय सर्व भत्ते देण्यात यावेत.

५. जिल्हा स्तरावरील संनियंत्रण व पर्यवेक्षण संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक्षक जिल्हा कृषि अधिकारी (जल संधारण) आणि उप जिल्हाधिकारी (रोहयो) यांनी करावे.

**ऐ) <u>या उपक्रमासाठी जिल्हा स्तरावर करावयाच्या बाबी :-</u>**

१. या उपक्रमाचे जिल्हास्तरावर उदघाटन संबंधित जिल्ह्याचे मा. पालक मंत्री यांचे हस्ते करण्यात यावे.

२. या उपक्रमाबाबत जिल्हा स्तरावर पत्रकार परिषद आयोजित करण्यात यावी व आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी.

३. या उपक्रमाबाबत ग्रामपंचायत स्तरावर दवंडी, उद्घोषणा, बैठक, सभा इ. च्या माध्यमातून पूर्व प्रसिद्धी करण्याबाबतच्या सूचना जिल्हास्तरावरुन सर्व ग्राम पंचायतींना निर्गमित करण्यात याव्यात.

**ओ) <u>उपक्रमासाठी ग्राम स्तरावर करावयाच्या बाबी :-</u>**

१. ग्राम स्तरावर या उपक्रमाचे उद्घाटन स्थानिक लोकप्रतिनिधी/पदाधिकारी/सन्माननीय नागरिक/मुख्याध्यापक इत्यादी मान्यवरांच्याहस्ते केले जावे.

२. सदर मोबाईल व्हॅन ज्या गावातून मार्गक्रमण करेल त्या गावातील ग्राम रोजगार सेवक व कृषि सहायकाने मोबाईल व्हॅनचे स्वागत गावातील उपरोक्त नमूद मान्यवरांच्या हस्ते करण्याबाबत स्थानिक पातळीवर सर्व व्यवस्था करावी.

३. गावात प्रवेश करतांना मोबाइल व्हॅनच्या ऑडिओ सिस्टमवरुन घोषणा व जिंगल्स वाजविण्यात याव्यात. त्यानंतर गावात व्हॅनच्या माध्यमातून फेरीचे आयोजन करण्यात यावे.

४. फेरी नंतर गावातील प्रमुख ठिकाणी वाहन थांबवून प्रदर्शन साहित्य मांडावे.
५. प्रदर्शनास भेट देण्यासाठी रॅली, गृह भेटी, घोषणा इ.माध्यमाद्वारे लोकांना प्रवृत्त करावे.
६. प्रदर्शनास भेट देण्यासाठी येणाऱ्या लोकांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व जलयुक्त शिवार अभियानाबाबत माहिती देण्यात यावी व आवश्यकतेनुसार संदर्भ साहित्यांचे वाटप करण्यात यावे.
७. प्रदर्शनानंतर योजनेसंबंधित शासनाकडून उपलब्ध करुन दिलेले महितीपट/यशोगाथा दाखविण्यात याव्यात.

**औ) उपक्रमाशी संबंधित आर्थिक अंदाजपत्रक**

उपरोक्त सर्व बाबींसाठी येणारा खर्च खाली नमूद तक्त्यामध्ये दिलेल्या अंदाजित खर्चाच्या अधिन राहून करावा :-

**तक्ता क्र. १**

**अ) एका व्हॅनसाठी येणारा अंदाजित खर्च (कालावधी १ महिना ) :-**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १. | भाडेतत्वावर व्हॅन घेणे (मेंटेनन्स, टोल, इंधन इ. सह) | रु.३०,०००/-प्रती महिना | रु. ३०,०००/- |
| २. | प्रोजेक्टर (स्क्रीनसह) भाडेतत्वावर घेणे (२६ दिवस) | रु. १५००/ प्रती दिवस | रु. ३९,०००/- |
| ३. | डीव्हीडी प्लेयर भाडेतत्वावर घेणे (२६ दिवस) | रु. ५००/- प्रती दिवस | रु. १३,०००/- |
| ४. | ऑडिओ सिस्टम-माइक, स्पीकर इ भाडेतत्वावर घेणे (२६ दिवस) | रु. ५००/- प्रती दिवस | रु. १३,०००/- |
| ५. | बॅटरी बॅकअप (मिनी जनरेटर) (२६ दिवस) | रु. ६००/- प्रती दिवस | रु. १५,६००/- |
| ६. | व्हॅन सजावट (पॅनेल छपाईसह) (जिल्हा स्तरावर) एकदा करावयाचा खर्च | रु. १०,०००/- | रु. १०,०००/- |
| | **एकूण खर्च** | | **रु. १,२०,६००/-** |

**कोकण, नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागातील ६८ मोबाईल व्हॅन्सकरिता येणारा खर्च (कालावधी १ महिना):- १,२०,६०० x ६८ व्हॅन्स= रु. ८२,००,८०० /- (अक्षरी रु. ब्याऐंशी लाख आठशे फक्त) इतका राहील.**

## तक्ता क्र.२

**ब) मोबाईल व्हॅनमधील आयईसी साहित्यासाठी लागणारा अंदाजित खर्च :**

| क्र. | तपशील | संख्या | यूनिट खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | प्रदर्शन संच (स्टॅंडीज)- २० विषयांवर (१० नरेगा + १० जलसंधारण) | ६८ व्हॅन | रु. २०००/- प्रती स्टॅंडी X २० स्टॅंडीज = ४००००/- | रु. २७,२०,००० |
| २ | डीव्हीडीज (शैक्षणिक महितीपट, जिंगल्स, स्पॉट्स इत्यादि) प्रत्येकी ५ डीव्हीडीज (१ यशोगाथा, २ शैक्षणिक व २ TVC व ऑडिओ स्पॉट्स) X ६८ वाहने | ३४० डीव्हीडी | रु. १०० | रु. ३४,००० |
| ३ | leaflets प्रती गाव ५०० या प्रमाणे साधारणपणे ३४१८ गावांसाठी-सामान्य नागरिकांसाठी | १७,०९,००० नग | रु. ०.५० | रु. ८,५४,५०० |
| ४ | ब्रोशर्स प्रती गाव ५० या प्रमाणे साधारणपणे ३४१८ गावांसाठी-सरपंच, ग्रामसेवक, बचतगट इत्यादींसाठी | १७०९०० | रु. १.०० | रु. १७०९०० |
| | **एकूण खर्च ( २१ जिल्ह्यांसाठी)** | | | **रु. ३७,७९,४००** |

## तक्ता क्र. ३

**मोबाईल व्हॅनद्वारे प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी दोन विभागांतील जिल्ह्यांकरिता येणारा खर्च ( कालावधी - एक महिना)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| **अ** | ६८ मोबाइल व्हॅनचा खर्च | **रु. ८२,००,८०० /-** |
| **ब** | जिल्हास्तरावर लागणारा प्रदर्शन संचाचा खर्च , आयईसी साहित्य इत्यादि | **रु. ३७,७९,४०० /-** |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **रु. ११९८०२००/-** |

**उपक्रमासाठीचा एकूण खर्च रु. ११९८०२००/- (अक्षरी एकशे एकोणीस लक्ष ऐंशी हजार दोनशे केवळ)**

**औ) उपक्रमाचे संनियंत्रण व अंमलबजावणी :-**

१. विभागस्तरावरुन विभागीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त (रोहयो) व विभागीय सह संचालक कृषि यांनी या उपक्रमाचे सनियंत्रण करावे व जिल्हानिहाय अहवाल शासनास सादर करावा.

२. जिल्हास्तरावरुन जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उप जिल्हाधिकारी (रोहयो) व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी या उपक्रमाचे सनियंत्रण करावे. तसेच,या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र १ मध्ये नमूद माहिती भरुन अहवाल विभागस्तरावर सादर करावा सोबत आईसी मोबाईल व्हॅनची छायाचित्रेसुध्दा सादर करावीत.

३. सदर उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी तालुकास्तरावर तालुका कृषि अधिकारी यांनी संबंधित तालुक्यांच्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती व तहसिलदार यांच्याशी समन्वय साधून करावी.

४. ग्राम पंचायत स्तरावर सदर उपक्रम राबविण्याची जबाबदारी ग्राम रोजगार सेवक व कृषि सहायक यांच्यावर सोपविण्यात येत आहे. तसेच, सदर उपक्रम राबविण्यात आल्याबाबतचा अहवाल प्रपत्र - २ मध्ये नमूद माहिती भरुन जिल्हयास सादर करावा.

**अं) निधीची उपलब्धता :-**

३. हा निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, (कृषि) यांना प्राधिकृत करण्यात येत असून वितरीत केलेला मंजूर निधी आपल्या स्तरावर आहरित करावा व सदर निधी संबंधीत २१ जिल्ह्यांना उपलब्ध करुन देण्यात यावा. याबाबतचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्रमांक एल-७, ४४०२- मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च -
१०२ - मृदसंधारण -, (०१) राज्य योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०१) (२१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, प्रसिध्दी व पारितोषिक योजना (४४०२ २३५१)
२६, जाहिरात व प्रसिध्दी"

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१४/प्र.क्र.६६/ अर्थसंकल्प-३ दिनांक २९ मार्च, २०१४ अन्वये प्रशासकिय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१५०३२०१४३०३३३१२६ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2015.03.23 13:57:57 +05'30'

**( वि.सि. वखारे )**
**उप सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा विरोधी पक्ष नेते विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
४. मा विरोधी पक्ष नेते विधानसभा यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,

९. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त (सर्व)
१३. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
१५. कार्याध्यक्ष आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती पुणे
१६. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१
१७. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१८. प्रधान वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२१. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२५. महालेखापाल , महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२६. अधिकदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२८. अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था. स्तर), पुणे नाशिक, औरंगाबाद, अमरावती
२९. उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक औरंगाबाद,अमरावती
३०. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
३१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३२. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) सर्व
३३. वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व
३४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३५. सर्व मंत्रालयीन विभाग,
३६. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा.वि. व ज.सं विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३८. कार्यासन जल-११, जल-३, जल-४ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३९. जल-८, निवड नस्ती.

# प्रपत्र-१

## मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून राबविल्या गेलेल्या जाणीव जागृती उपक्रमाचा संनियंत्रण आराखडा

### जिल्हास्तरीय उपक्रम

| उपक्रम तपशील | दिनांक | ठिकाण | उपस्थितांची संख्या | इतर माहिती |
|---|---|---|---|---|
| उपक्रमाचे प्रशिक्षण | | | | |
| पत्रकार परिषद | | | | |
| उद्घाटन समारंभ | | | | |
| इतर उपक्रम | | | | |

# प्रपत्र-२

## मोबाइल व्हॅनच्या  माध्यमातून राबविल्या गेलेल्या जाणीव जागृती उपक्रमाचा संनियंत्रण आराखडा

### ग्रामस्तरीय उपक्रम

| उपक्रम तपशील | दिनांक | ठिकाण | उपस्थितांची संख्या / संख्या | संबंधित माहिती / विवरण |
|---|---|---|---|---|
| पूर्व प्रसिद्धी उपक्रम (दवंडी, घोषणा, सभा इत्यादि) | | | | |
| उद्घाटन समारंभ | | | | |
| शिवार फेरी | | | | |
| गृहभेटी | | | | |
| प्रदर्शनाचे आयोजन | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| योजनेंची माहिती देणे (जलयुक्त शिवार व नरेगा) | | | | |
| लघुपट व महितीपट दाखविणे | | | | |
| आयईसी साहित्याचे वाटप | | | | |
| इतर उपक्रम (काही असल्यास) | | | | |

नाव व स्वाक्षरी:
ग्राम रोजगार सेवक

नाव व स्वाक्षरी
कृषि सहायक

# जलयुक्त शिवार अभियानाची मोबाईल व्हॅनद्वारे प्रचार व प्रसिध्दी करण्याच्या खर्चाचा तपशील

| जिल्हा | जलयुक्त शिवार ग्राम पंचायती | आवश्यक व्हॅन | प्रती व्हॅनचा भाडे खर्च १,२०,६००/- | प्रदर्शन संच (रु. ४००००/- प्रती संच) | ५ सीडीज प्रती व्हॅन (संख्या) | सीडी/डीव्हीडी (रु.१००/- प्रती व्हॅन प्रमाणे) | पाम्फलेट/ प्रती गाव ५०० नग | पाम्फलेट खर्च - प्रती पाम्फलेट ५० पैसे प्रमाणे | ब्रोशर / प्रती गाव ५० नग | प्रती ब्रोशर रु. १/- प्रमाणे | प्रती जिल्हा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [redacted] | | | | | | | | | | | |
| रायगड | ४५ | १ | १२०६०० | ४०००० | ५ | ५०० | २२५०० | ११२५० | २२५० | २२५० | १७४६०० |
| रत्नागिरी | ४५ | १ | १२०६०० | ४०००० | ५ | ५०० | २२५०० | ११२५० | २२५० | २२५० | १७४६०० |
| सिंधुदुर्ग | ३४ | १ | १२०६०० | ४०००० | ५ | ५०० | १७००० | ८५०० | १७०० | १७०० | १७१३०० |
| ठाणे | २६ | १ | १२०६०० | ४०००० | ५ | ५०० | १३००० | ६५०० | १३०० | १३०० | १६८९०० |
| पालघर | ५० | १ | १२०६०० | ४०००० | ५ | ५०० | २५००० | १२५०० | २५०० | २५०० | १७६१०० |
| **एकूण** | २०० | ५ | ६०३००० | २००००० | २५ | २५०० | १००००० | ५०००० | १०००० | १०००० | ८६५५०० |
| [redacted] | | | | | | | | | | | |
| अहमदनगर | २७९ | ६ | ७२३६०० | २४०००० | ३० | ३००० | १३९५०० | ६९७५० | १३९५० | १३९५० | १०५०३०० |
| धुळे | १२९ | २ | २४१२०० | ८०००० | १० | १००० | ६४५०० | ३२२५० | ६४५० | ६४५० | ३६०९०० |
| जळगाव | २३२ | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | ११६००० | ५८००० | ११६०० | ११६०० | ७१४००० |
| नंदुरबार | ७२ | २ | २४१२०० | ८०००० | १० | १००० | ३६००० | १८००० | ३६०० | ३६०० | ३४३८०० |
| नाशिक | २२९ | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | ११४५०० | ५७२५० | ११४५० | ११४५० | ७१३१०० |
| **एकूण** | ९४१ | १८ | २१७०८०० | ७२०००० | ९० | ९००० | ४७०५०० | २३५२५० | ४७०५० | ४७०५० | ३१८२१०० |

| जिल्हा | जलयुक्त शिवार ग्राम पंचायती | आवश्यक व्हॅन | प्रती व्हॅनचा भाडे खर्च १,२०,६००/- | प्रदर्शन संच (रु. ४००००/- प्रती संच) | ५ सीडीज प्रती व्हॅन (संख्या) | सीडी/डीव्हीडी (रु.१००/- प्रती व्हॅन प्रमाणे) | **पाम्फ्लेट/ प्रती गाव ५०० नग** | पाम्फ्लेट खर्च - प्रती पाम्फ्लेट ५० पैसे प्रमाणे | **ब्रोशर / प्रती गाव ५० नग** | प्रती ब्रोशर रु. १/- प्रमाणे | प्रती जिल्हा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | | | | | | | | | | | |
| भंडारा | ८६ | २ | २४१२०० | ८०००० | १० | १००० | ४३००० | २१५०० | ४३०० | ४३०० | ३४८००० |
| चंद्रपुर | २१८ | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | १०९००० | ५४५०० | १०९०० | १०९०० | ७०९८०० |
| गडचिरोली | १५२ | ३ | ३६१८०० | १२०००० | १५ | १५०० | ७६००० | ३८००० | ७६०० | ७६०० | ५२८९०० |
| गोंदिया | ९४ | २ | २४१२०० | ८०००० | १० | १००० | ४७००० | २३५०० | ४७०० | ४७०० | ३५०४०० |
| नागपुर | ३१३ | ६ | ७२३६०० | २४०००० | ३० | ३००० | १५६५०० | ७८२५० | १५६५० | १५६५० | १०६०५०० |
| वर्धा | २१४ | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | १०७००० | ५३५०० | १०७०० | १०७०० | ७०८६०० |
| **एकूण** | १०७७ | २१ | २५३२६०० | ८४०००० | १०५ | १०५०० | ५३८५०० | २६९२५० | ५३८५० | ५३८५० | **३७०६२००** |
| [illegible] | | | | | | | | | | | |
| अकोला | १८० | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | ९०००० | ४५००० | ९००० | ९००० | ६९८४०० |
| अमरावती | २४३ | ५ | ६०३००० | २००००० | २५ | २५०० | १२१५०० | ६०७५० | १२१५० | १२१५० | ८७८४०० |
| बुलढाणा | २५६ | ५ | ६०३००० | २००००० | २५ | २५०० | १२८००० | ६४००० | १२८०० | १२८०० | ८८२३०० |
| वाशिम | १८५ | ४ | ४८२४०० | १६०००० | २० | २००० | ९२५०० | ४६२५० | ९२५० | ९२५० | ६९९९०० |
| यवतमाळ | ३३६ | ६ | ७२३६०० | २४०००० | ३० | ३००० | १६८००० | ८४००० | १६८०० | १६८०० | १०६७४०० |
| **एकूण** | १२०० | २४ | २८९४४०० | ९६०००० | १२० | १२००० | ६००००० | ३००००० | ६०००० | ६०००० | ४२२६४०० |
| **एकूण** | ३४१८ | ६८ | ८२००८०० | २७२०००० | ३४० | ३४००० | १७०९००० | ८५४५०० | १७०९०० | १७०९०० | ११९८०२०० |

# प्रपत्र- ३

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | मंजूर रक्कम (अक्षरी) | मंजूर रक्कम (अक्षरी) |
|---|---|---|---|
| | कोकण विभाग | | |
| १ | रायगड | १७४६०० | रुपये एक लाख चौराहात्तर हजार सहाशे फक्त |
| २ | रत्नागिरी | १७४६०० | रुपये एक लाख चौराहात्तर हजार सहाशे फक्त |
| ३ | सिंधुदुर्ग | १७१३०० | रुपये एक लाख एकाहात्तर हजार तीनशे फक्त |
| ४ | ठाणे | १६८९०० | रुपये एक लाख अडुसष्ट हजार नऊशे फक्त |
| ५ | पालघर | १७६१०० | रुपये एक लाख श्याहत्तर हजार शंभर फक्त |
| | एकुण | ८६५५०० | रुपये आठ लाख पासष्ट हजार पांचशे फक्त |
| | नाशिक विभाग | | |
| ६ | अहमदनगर | १०५०३०० | रुपये दहा लाख पंन्नास हजार तीनशे फक्त |
| ७ | धुळे | ३६०९०० | रुपये तीन लाख साठ हजार नऊशे फक्त |
| ८ | जळगाव | ७१४००० | रुपये सात लाख चौदा हजार फक्त |
| ९ | नंदुरबार | ३४३८०० | रुपये तीन लाख त्रेचाळीस हजार फक्त |
| १० | नाशिक | ७१३१०० | रुपये सात लाख तेरा हजार शंभर फक्त |
| | एकुण | ३१८२१०० | रुपये एकतीस लाख ब्याऐंशी हजार शंभर फक्त |
| | नागपुर विभाग | | |
| ११ | भंडारा | ३४८००० | रुपये तीन लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त |
| १२ | चंद्रपुर | ७०९८०० | रुपये सात लाख नऊ हजार आठशे फक्त |
| १३ | गडचिरोली | ५२८९०० | रुपये पाच लाख अठ्ठावीस हजार नऊशे फक्त |
| १४ | गोंदिया | ३५०४०० | रुपये तीन लाख पन्नास हजार चारशे फक्त |
| १५ | नागपुर | १०६०५०० | रुपये दहा लाख साठ हजार पांचशे फक्त |
| १६ | वर्धा | ७०८६०० | रुपये सात लाख आठ हजार सहाशे फक्त |
| | एकुण | ३७०६२०० | रुपये सदतीस लाख सहा हजार दोनशे फक्त |
| | अमरावती विभाग | | |
| १७ | अकोला | ६९८४०० | रुपये सहा लाख अठ्ठयाण्णव हजार चारशे फक्त |
| १८ | अमरावती | ८७८४०० | रुपये आठ लाख अठ्ठयाहत्तर हजार चारशे फक्त |
| १९ | बुलढाणा | ८८२३०० | रुपये आठ लाख ब्याऐंशी हजार तीनशे फक्त |
| २० | वाशिम | ६९९९०० | रुपये सहा लाख नव्याण्णव हजार नऊशे फक्त |
| २१ | यवतमाळ | १०६७४०० | रुपये दहा लाख सदुसष्ट हजार चारशे फक्त |
| | एकुण | ४२२६४०० | रुपये बेचाळीस लाख सव्वीस हजार चारशे फक्त |
| | एकुण | ११९८०२०० | रुपये एक कोटी एकोणीस लाख ऐंशी हजार दोनशे फक्त |